Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 6, July 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# कुरूंदवाड (सि.) संस्थान :- शैक्षणिक प्रगतीचा इतिहास

डी. आर. डुबल

इतिहास विभाग, मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर
ता. बारामती, जि. पुणे **412306**.

## *प्रस्तावना :–*

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मुंबई इलाख्यात 18 संस्थाने होती. या मुंबई इलाख्यातील संस्थानांना भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही संस्थांने दक्षिणी संस्थाने म्हणूनही परिचीत आहेत. ही सर्व संस्थाने ब्रिटीश अधिसत्तेचे माडंलिक होते. या दक्षिणी संस्थानमध्ये कुरूंदवाड (सि.), कुरूंदवाड (ज्यु.), मिरज, मिरज (ज्यु.), तासगाव, सांगली ही पटवर्धन घराण्याची संस्थाने होती. या पटवर्धन संस्थानामध्ये कुरूंदवाड (सि.) संस्थान हे एक दक्षिणेकडील महत्त्वाचे संस्थान होते. ही जरी संस्थान असले तरी प्रथमता जहागिरी म्हणून उदयास आली होती. नंतर काळाच्या ओघात या जहागिरीचे ब्रिटीश कालखंडात संस्थानात रूपांतर झाले.
कुरूंदवाड (सि.) संस्थानाला अनेक कर्तबगार राज्यकर्त्यांची परंपरा लाभली होती. यामध्ये क्रमशा रघुनाथराव पटवर्धन, चिंतामणराव पटवर्धन, भालंचद्र पटवर्धन हे होते. या राज्यकर्त्यांनी ब्रिटीश पोलिटिकल एजंटच्या मार्गदर्शनाखाली संस्थानात ब-याच पुरोगामी सुधारणा घडवून आणल्या, पुरोगामी सुधारणांना चालना देऊन संस्थानचा कायापालट घडवून आणण्यात तेथील संस्थान अधिपतीची भूमिका ही महत्त्वाची होती. सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा, आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती, प्रशासकीय व घटनात्मक सुधारणा, आरोग्य सुधारणा इत्यादी क्षेत्रात कुरूंदवाड (सि.) संस्थानने उल्लेखनिय प्रगती केलेली दिसून येते.

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये कुरूंदवाड (सि.) संस्थानमधील शैक्षणिक प्रगती याविषयी ऐतिहासिक संशोधनपर विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

### शैक्षणिक प्रगती :-

19 व्या शतकाच्या मध्यानंतर शिक्षण व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल होत गेले. व्यावसायिक शिक्षणाबरोबर सुशिक्षित भारतीय वर्ग, खाजगी शिक्षण संस्था आणि ब्रिटीश सरकार यांच्या प्रयत्नातून शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवुन या बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. ब्रिटीश सरकार प्रमाणे दक्षिणेतील 18 संस्थानामध्ये ही शैक्षणिक प्रगती होऊलागली छत्रपती शाहू महारांजाचे कोल्हापूर संस्थान, औधचे पतंप्रतिनीधीचे संस्थान या मोठया संस्थानानी शैक्षणिक प्रगती साधून आमुलाग्र बदल घडवून आणला. परिणामी दक्षिणेतील इतर संस्थानचे अधिपती ही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न करू लागली. याला कुरूंदवाड (सि.) संस्थानही अपवाद नव्हते. या संस्थानच्या अधिपतीनी ही आपल्या संस्थानात शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला होता.

### प्राथमिक शिक्षण :-

कुरूंदवाड (सि.) संस्थानचे अधिपती चिंतामणराव पटवर्धन [**1876-1908**] हे उच्च शिक्षित होते. त्यांना शिक्षणाची जाणीव होती म्हणून त्यांनी आपल्या या छोटयांशा संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला. संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार केला. संस्थानात प्राथमिक शाळा स्थापन केल्या. प्राथमिक शिक्षण मोफत केले आणि संस्थान प्रजेसाठी शिक्षणाची दारे खुली करून शिक्षणाच्या प्रसाराची मुहुर्तमेढ रोवली.[1] त्यानंतर संस्थान अधिपती भालचंद्र पटवर्धन [**1908-1927**] यांनी संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत होते ते तसेच चालू ठेवले त्याच बरोबर संस्थानात एक हजार वस्तीच्या खेडयामध्ये एक प्राथमिक शाळा, दोन हजार लोकवस्तीच्या खेडयामध्ये मुलांची व मुलीची प्राथमिक शाळा[2] आणि लहान खेडयाच्या ठिकाणी मराठी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षण देणा-या शाळा स्थापन केल्या होत्या[3] भालचंद्र पटवर्धन महाराज यांच्या कालखंडात सन **1908-1909** मध्ये प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण देणा-या शाळांची संख्या **16** इतकी होती त्यापैकी मुली आणि मागासवर्गीय मुलासाठी प्रत्येकी एक शाळा आणि एकूण विद्यार्थी संख्या **746** इतकी होती या शिक्षणासाठी **5634** रूपये खर्च करण्यात आले होते.[4] भालचंद्र पटवर्धन यांच्या शैक्षणिक धोरणाचे वैशिष्टये म्हणजे प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण खर्चासाठी कायमची आर्थिक तरतूद म्हणून आपल्या महसुल वसुलापैकी अर्धा टक्का रक्कम शैक्षणिक व आरोग्य खात्याकडे वर्ग करण्याचा निर्णय करून त्याची अमंलबजावणी सुरू केली होती या रक्कमेतुन प्रशस्त अशा शाळा, इमारती, गरजु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती गरिब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी माफ या सुविधा उपलब्ध करून दिल्या.[5] सन **1927-28** मध्ये प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण देणा-या शाळांची संख्या **26** इतकी होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या

**Please cite this Article as :** डी. आर. डुबल , कुरूंदवाड (सि.) संस्थान :- शैक्षणिक प्रगतीचा इतिहास : **Indian Streams Research Journal (July ; 2012)**

26 इतकी होती . या शाळेतील विद्यार्थी संख्या 1460 असून या शिक्षणासाठी 17,936 रूपये खर्च करण्यात आले होते .[6]

संस्थानचे शेवटचे अधिपती चिंतामराव पटवर्धन [1941-1948] यांच्या कारकीर्दीत सन 1943 मध्ये प्राथमिक व दुय्यम शिक्षण देणा-या शाळाची संख्या 32 इतकी होती . या शिक्षणासाठी 22,716 रूपये खर्च करण्यात आले होते .[7]

एकूणच कुरूंदवाड (सि .) संस्थानमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत उल्लेखनीय प्रगती साधलेली होती . जवळजवळ प्रत्येक खेडयामध्ये एक प्राथमिक शाळा होती . संस्थान शाळामध्ये विद्यार्थ्यी संख्या उत्तरोत्तर वाढ होत होती असे स्पष्ट होते .

**माध्यमिक शिक्षण :-**

सिताबाई पटवर्धन हायस्कूल स्थापना - 1925 कुरूंदवाड (सि .) संस्थानमध्ये माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्याने संस्थानातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी ब्रिटीश हद्दीतील किंवा इतर संस्थानच्या ठिकाणी जावे लागत होते म्हणून भालचंद्र पटवर्धन महाराजांनी सन 1925 मध्ये आपल्या आजीबाई श्रीमंत सिताबाई पटवर्धन यांच्या पुण्य स्मरणार्थ 'सिताबाई पटवर्धन हायस्कूल, कुरूंदवाड' स्थापन केले आणि संस्थानातील प्रजाजनांना इग्रंजी व माध्यमिक शिक्षणाची सुविधा प्राप्त करून दिली .[8] या हायस्कूलमध्ये इंग्रजी 5 वी पर्यंत, मराठी माध्यम 7 वी पर्यंत आणि चित्रकला वर्ग यांचे शिक्षण दिले होते .[9] सन 1925 मध्ये स्थापनेच्या वर्षी 152 विद्यार्थी संख्या होती .[10] नतंरच्या कालखंडात विद्यार्थी संख्या वाढत गेलेली होती .

आज कुरूंदवाड (सि .) संस्थानकालीन शैक्षणिक विकासाचा वारसा असलेले हे हायस्कूल "एस . पी . हायस्कूल" म्हणून ओळखले जाते . ते आजही कुरूंदवाड पंचक्रोशीत शैक्षणिक दृष्टया अग्रेसर आहे .

**इंग्रजी शिक्षण :-**

संस्थान अधिपतीनी इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व ओळखाले होते . म्हणून चिंतामणराव पटवर्धन यांनी सन 1870 मध्ये 2 री पर्यंत इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून आपल्या संस्थानात इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ केला होता . सन 1890 मध्ये 5 वी पर्यंत इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्यास सुरूवात केली .[11] शिक्षणप्रेमी भालचंद्र पटवर्धन महाराज यांनी पाच हजार लोकवस्तीच्या खेडयामध्ये मराठी माध्यम शिक्षणाबरोबर 3 री पर्यंत इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणा-या शाळाची स्थापना केली हे शिक्षण मोफत उपलब्ध करून दिले .[12] तसेच सन 1925 मध्ये स्थापन केलेले सिताबाई पटवर्धन हायस्कूल, कुरूंदवाड या माध्यमिक शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातुन 5 वी पर्यंत शिक्षणाची व्यवस्था केली होती . याच कालखंडामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार व विस्तार झाला .[13] यावरून इंग्रजी शिक्षणाच्या बाबतीत संस्थान अधिपतीनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन विकास साधन्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो .

**मागासवर्गीयासाठी शैक्षणिक सुविधा :-**

कुरूंदवाड (सि .) संस्थान अधिपतीनी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यासाठी खुले करण्याचे धोरण स्वीकारले होते . कारण कुरूंदवाड (सि .) संस्थान हे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कोल्हापूर संस्थानच्या सीमेलगतचे जवळचे संस्थान होते . त्यामुळे छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा ठसा कुरूंदवाड संस्थान अधिपतीच्या मनावर पडला होता . परिणामी कुरूंदवाड (सि .) संस्थान अधिपतीनी मागासवर्गीय मुलाच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसून येतात . मागासवर्गीय समाजाला इतर समाजाबरोबर शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले . शन 1907-08 मध्ये मागासवर्गीय मुलांसाठी कुरूंदवाडया राजधानीच्या ठिकाणी प्रथमच "मागासवर्गीय प्राथमिक शाळा" स्थापन करण्यात आली . स्थापनेच्या वेळी विद्यार्थी संख्या 35 इतकी होती .[14] मागासवर्गीय मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी मोफत प्राथमिक शिक्षण, फी सवलती, शिष्यवृत्ती इत्यादी शैक्षणिक योजना राबवण्यात आल्या . त्याचप्रमाणे संस्थानचे शेवटचे अधिपती चिंतामणराव पटवर्धन (1941-1948) यांनी शिक्षणाचे महत्त्व मागासवर्गीय समाजाला कळावे . शैक्षणिक जागृती होण्यासाठी 'मागासवर्गीय साक्षरता अभियान' योजना राबवली .[15] सन 1930-31 मध्ये मागासवर्गीय शाळेची संख्या 4 होती . विद्यार्थी संख्या 109 असून या शिक्षणासाठी 557 रूपये खर्च करण्यात आले होते .[16] सन 1937-38 मध्ये 4 शाळा आणि विद्यार्थी संख्या 115 होती या शिक्षणासाठी 827 रूपये खर्च करण्यात आले होते .[17] एकूणच कुरूंदवाड (सि .) संस्थान अधिपतीनी मागासवर्गी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिलेले दिसून येते . परंतू औंध, कोल्हापूर संस्थानच्या शैक्षणिक प्रगतीपेक्षा कुरूंदवाड (सि .) संस्थान हे मागासलेले दिसून येते .

**मुलीसाठी शिक्षण व्यवस्था :-**

20 व्या शतकाच्या प्रांरभी कोल्हापूर, औंध, सांगली संस्थानात स्त्री शिक्षणासाठी जे प्रयत्न केले त्याचा परिणाम कुरूंदवाड (सि .) संस्थानवर झालेला होता . चिंतामणराव पटवर्धन (1876-1908) यांच्या कारकिर्दीत मुलीच्या शिक्षणाला प्रारंभ झाला . त्यांच्या कारकीर्दीत सन 1907 मध्ये मुलीची प्राथमिक शाळा स्थापन झाली आणि स्त्री शिक्षणाच्या विकासाचा पाया रचला गेला .[18] त्यानंतर सन 1914 ला दोन हजार लोकवस्तीच्या खेडयामध्ये मुलाच्या शाळेबरोबर मुलीची प्राथमिक शाळा सुरू केली होती आणि हे प्राथमिक शिक्षण मोफत केले होते .[19] मुलींना प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण मोफत होते . त्याचबरोबर फी माफी सवलत, शिष्यवृत्ती इ . योजना अमलात आणल्या होत्या . सन 1937-38 मध्ये मुलीच्या शाळाची संख्या 3 होती तर विद्यार्थी संख्या 284 इतकी होती या शिक्षणासाठी 2945 रूपये खर्च केले होते .[20]

एकूणच कुरूंदवाड (सि .) संस्थान अधिपतीनी मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले होते आणि प्रगती साधण्याचा प्रयत्न केला होता .

**शिष्यवृत्ती आणि नादारी योजना :-**

संस्थानचा शैक्षणिक विकास व्हावा आणि शिक्षण प्रसार व्हावा यासाठी काही योजना कार्यान्वीत केल्या होत्या . हुशार होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिष्यवृत्ती दिली जात होती तर आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी फी माफ केली जात होती . सन 1914-15 या वर्षी 948 इतके रूपये शिष्यवृत्ती म्हणून दिली होती .[21] सन 1927-28 मध्ये 612 रूपये शिष्यवृत्ती तर सन 1942-43 मध्ये 1000 रूपये शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना दिली होती .[22] यावरून हे स्पष्ट होते की, कुरूंदवाड (सि .) संस्थान अधिपतीनी शिष्यवृत्ती व नादारी योजना चागंल्या प्रकारे राबवली होती आणि शैक्षणिका विकास साधण्याचा प्रयत्न केला होता .

### प्रशासकीय नियंत्रण :-

कुरूंदवाड (सि .) संस्थानने शैक्षणिक विकास आणि विस्तार मोठया प्रमाणात साधला होता . या शिक्षण विभागावर संस्थान अधिपती आणि स्टेट कारभारी यांचे नियंत्रण होते . त्याचबरोबर प्रशासकीय नियंत्रण म्हणून सिताबाई पटवर्धन हायस्कूल, कुरूंदवाड येथील मुख्याध्यापक हे श्‍दुचर्तेनिल ीन्स्पएच्तेर म्हणून कार्यरत होते . त्याच्या नियंत्रणाखाली संस्थानातील सर्व शाळेचे व्यवस्थापन चालत असे .[23]

एकूणच कुरूंदवाड (सि .) संस्थानची शैक्षणिक प्रगती ही समाधानकारक होती प्रत्येक अधिपतीनी शैक्षणिक विकासाकडे विशेष लक्ष दिले होते . शैक्षणिक विकास मोठया प्रमाणात साधला होता आणि जवळजवळ प्रत्येक खेडयामध्ये एक प्राथमिक शाळा होती . हेच संस्थानातील शैक्षणिक विकासाचे वैशिष्टये होते . शैक्षणिक विकासाची उणीव होती ती म्हणजे उच्च शिक्षणाची संस्थानात व्यवस्था नसल्याने संस्थानातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संस्थान बाहेर जावे लागत होते . मात्र संस्थान अधिपतीनी शैक्षणिक प्रगतीसाठी केलेले प्रयत्न निश्‍चितच उल्लेखनीय असल्याचे आढळते .

### संदर्भ ग्रंथ सूची


1) आपटे गो . वि ., संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास, वाई, 1919, पृष्ठ . क्र . 130
2) कित्ता, पृष्ठ क्र . 132
3) कुलकर्णी धोंडो (भाऊ) केशव, कुरूंदवाड (सि .) संस्थानचे भुगोल वर्णन, विद्या विलास प्रेस, कोल्हापूर, पृष्ठ क्र . 32, 33
4) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1909, पृष्ठ क्र . 11
5) आपटे गो . वि . उपरोक्त, पृष्ठ क्र . 132
6) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1927-28, पृष्ठ क्र . 42
7) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1942-43, पृष्ठ क्र . 10
8) सिताबाई पटवर्धन हायस्कूल कुरूंदवाड, संयुक्त रौप्य, सुवर्ण महोत्सव स्मरणीका, सन 1979, पृष्ठ क्र . 1
9) कित्ता, पृष्ठ क्र . 2
10) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1926-27, पृष्ठ क्र . 40
11) आपटे गो . वि :, उपरोक्त, पृष्ठ क्र . 130
12) कित्ता, पृष्ठ क्र . 133
13) सिताबाई पटवर्धन हायस्कूल स्मरणीका, उपरोक्त, पृष्ठ क्र . 1
14) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1909-10, पृष्ठ क्र . 34
15) दैनिक सत्यवादी, दक्षिणी संस्थानचा खास अंक, माहे . जून 1940, पृष्ठ क्र . 96
16) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1930-31, पृष्ठ क्र . 42
17) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1937-38, पृष्ठ क्र . 53
18) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1906-10, पृष्ठ क्र . 34
19) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1913-14, पृष्ठ क्र . 12
20) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1937-38, पृष्ठ क्र . 21
21) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1914-15, पृष्ठ क्र . 12
22) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1927-28, पृष्ठ क्र . 14, सन 1942-43 पृष्ठ क्र . 10
23) कुरूंदवाड (सि .) संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन 1927-28, पृष्ठ क्र . 15